महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
MEDA महाऊर्जा
हरितोर्जायाः विनियोगात् वसुन्धराविकासः।

# महाऊर्जा वार्ता

जुलै ते सप्टेंबर २०२५ — त्रैमासिक अंक

## महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण

महाराष्ट्र शासनाने राज्यात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा म्हणजेच नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांचा विकास व प्रसार करण्यासाठी तसेच ऊर्जा संवर्धन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या स्वायत्त मूलाधार शासकीय संस्थेची स्थापना केली आहे. महाऊर्जाची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये तसेच सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये करण्यात आली आहे. ऊर्जा संवर्धन कायदा-२००१ अंतर्गत महाऊर्जास पदनिर्देशित संस्था म्हणून शासनाने घोषित केले आहे.

महाऊर्जाचा प्रमुख उद्देश नवीन व नवीकरणीय अपारंपरिक स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मिती करणारे प्रकल्प/योजना/साधने यांचा व ऊर्जा संवर्धनाचा विकास आणि प्रचार करणे. नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मिती करण्यास प्रोत्साहन देणे. ऊर्जा बचत व ऊर्जा कार्यक्षमतेचे कार्यक्रम हाती घेऊन त्याचा प्रसार करणे तसेच राज्य शासन व केंद्र शासनाचे नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक कार्यक्रम राबविणे.

महाऊर्जाच्या नियामक मंडळामध्ये मा.मंत्री, नवीन व नवीकरणीय ऊर्जा हे पदसिद्ध अध्यक्ष असून मा. राज्यमंत्री, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, महाराष्ट्र राज्य हे पदसिध्द उपाध्यक्ष आहेत. शासनाच्या ऊर्जा, नियोजन, उद्योग, ग्राम विकास, कृषि विभागांचे सचिव तसेच महावितरण, महापारेषण व महासूत्रधार कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक हे पदसिध्द सदस्य असून महाऊर्जाचे महासंचालक हे सदस्य सचिव आहेत.

महाऊर्जाने पारेषण संलग्न (grid-connected) नवीन व नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पाकडे लक्ष केंद्रित केले असून ३० जून, २०२५ अखेर राज्यात १५३६७.०० मेगावॅट क्षमतेचे पवनऊर्जा प्रकल्प उभारण्यास वाव आहे. शासाच्या खाजगी गुंतवणकीद्वारे पारंपरिक ऊर्जा प्रकल्प सुरु करण्यात आले आहेत. त्यामध्ये पवन ऊर्जा प्रकल्प ५३५०.९१ मेगावॅट, ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प २७३२. ८० मेगावॅट, कृषि अवशेषांवर आधारीत प्रकल्प २४४ मेगावॅट, औद्योगिक कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प ४१.७८८ मेगावॅट, शहरी घन व द्रव कचऱ्यापासून वीजनिर्मिती १७ मेगावॅट, सौर ऊर्जा प्रकल्प ६६३९.७१६ मेगावॅट आणि लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प ३७०.०७५ मेगावॅट एवढया क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.



## पवनऊर्जेपासून वीज निर्मिती -

देशात ६९५५०९ मेगावॅट इतक्या क्षमतेचे पवनऊर्जेपासून वीज निर्मितीचे प्रकल्प उभारण्यास वाव असून त्यापैकी ९८२१० मेगावॅट इतक्या वीज निर्मितीला महाराष्ट्रात वाव आहे. केंद्र शासनाच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय यांच्या सहाय्याने व महाऊर्जा निधीतून राज्यात ११.०९ मेगावॅट क्षमतेचे पथदर्शी पवन ऊर्जा प्रकल्प सुरुवातीस उभारण्यात आले आहेत. राज्यात दि. ३०/०६/२०२५ पर्यंत ५३५०.२८९ मेगावॅट क्षमतेचे पवन ऊर्जा प्रकल्प प्रामुख्याने खाजगी विकासकांमार्फत उभारण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील सर्वात मोठा ५८१ मेगावॅट एवढ्या क्षमतेचा पवनऊर्जा प्रकल्प धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यात विकसित झाला आहे.

शासनाने दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी अपारंपरिक ऊर्जा धोरण-२०२० जाहीर केले असून या धोरणांतर्गत २५०० मे.वॅ. क्षमतेचे पवन ऊर्जा प्रकल्प आस्थापित करणेचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत राज्यात नित्य नूतनशील ऊर्जा खरेदी बंधन पूर्ण करण्याकरीता, राज्यात निजीवापार, खुला प्रवेश व इतर राज्यात विजेची निर्यात करण्यासाठी पवन ऊर्जा प्रकल्प विकसित करता येतील. अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीच्या प्रकल्पांसाठी एकत्रित धोरण-२०२० बाबतची एकत्रित कार्यपध्दती दिनांक ११ मे, २०२२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली. तसेच अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० मध्ये, अपारंपारिक ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना सोयी सवलती/ अनुदान स्वरुपात आर्थिक सहाय्य अंतर्भूत करुन प्रोत्साहनात्मक सुधारणा दि. ३० जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आल्या आहेत.

## ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती -

ऊसाच्या चिपाडावर (बगॅस) आधारित सहवीज निर्मिती प्रकल्पांमध्ये साखर कारखान्यात ऊसाच्या गाळपानंतर उरलेल्या बगॅसचा इंधन म्हणून वापर केला जातो. हा बगॅस उच्च दाबाच्या बॉयलरमध्ये जाळला जातो, ज्यामुळे वाफ तयार होते. ही वाफ टर्बाइन चालवते आणि विजेचे उत्पादन होते. राज्यात सहवीज निर्मिती प्रकल्पाद्वारे ३९१७ मेगावॅट अतिरिक्त वीज निर्मितीस वाव आहे. महाराष्ट्रात दि. ३० जून २०२५ अखेर ऊसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मितीचे एकूण १५६ प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्यांची एकत्रित क्षमता २७३२.८० मे.वॅ. इतकी आहे. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे धोरण-२०२० अंतर्गत दि. ३० जून २०२५ अखेर ४२१.६ मे.वॅ. क्षमतेच्या २३ सहवीज निर्मिती प्रकल्पांना महाऊर्जामार्फत नोंदणी देण्यात आली आहे. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे धोरण-२०२० अंतर्गत सहवीज निर्मिती प्रकल्पांतून तयार होणाऱ्या विजेचा वापर स्वयंवापरासाठी केल्यास प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून सदर प्रकल्पास पुढील १० वर्षासाठी विद्युत शुल्क (Electricity Duty) माफ करण्यात येते.

## शहरी घन कचरा/औद्योगिक कचऱ्यापासून वीज निर्मिती -

वाढत्या शहरीकरण व औद्योगिकीकरणामुळे कचरा निर्मिती मोठ्या प्रमाणात होत असून त्याची विल्हेवाट लावणे ही एक समस्या बनली आहे. या समस्येवर मात करुन विकसित तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन या कचऱ्यापासून मोठ्या प्रमाणात ऊर्जा निर्मिती करणे शक्य आहे. सध्या उपलब्ध असलेले तंत्रज्ञान पाहता, कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती प्रकल्प आर्थिक दृष्टीने सक्षम ठरु शकतात. महाराष्ट्रामध्ये एकूण ८९८ मेगावॅट क्षमतेचे शहरी घनकचऱ्यापासुन वीज निर्मिती प्रकल्प उभारणेस वाव आहे. महाराष्ट्रात दि. ३० जून २०२५ अखेर औद्योगिक कचऱ्यावर आधारित ५८.७८८ मे.वॅ. व शहरी घनकचऱ्यावर आधारित १७ मे.वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न प्रकल्प असे एकूण ५८.७८८ मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे धोरण-२०२० अंतर्गत शहरी घनकचरा/औद्योगिक कचऱ्यावर आधारित वीज निर्मिती प्रकल्पांतून तयार होणाऱ्या विजेचा वापर स्वयंवापरासाठी केल्यास प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या दिनांकापासून सदर प्रकल्पास पुढील १० वर्षासाठी विद्युत शुल्क (Electricity Duty) माफ करण्यात येते.

## लघु जलस्त्रोतांपासून वीज निर्मिती -

लघु जलविद्युत प्रकल्प म्हणजे पाण्याच्या प्रवाहाचा उपयोग करून वीज निर्मिती करणे. नदी किंवा प्रवाहातील पाणी टर्बाइनद्वारे सोडले जाते, जेणे करुन टर्बाइन्स फिरुन वीज निर्मिती केली जाते. हे तंत्रज्ञान पर्यावरणास अनुकूल असून, ग्रामीण भागात वीज पुरवठ्यासाठी उपयुक्त आहे. महाराष्ट्रात ७८६.४६ मेगावॅट क्षमतेचे लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प उभारणेस वाव आहे. महाराष्ट्रात दि. ३० जून २०२५ अखेर एकूण ३७०.०७५ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प जलसंपदा विभागा मार्फत उभारले आहेत. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे धोरण-२०२० अंतर्गत दि. ३० जून २०२५ अखेर १७.१७८ मे.वॅ. क्षमतेच्या ०७ लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्पांना महाऊर्जा मार्फत नोंदणी देण्यात आली आहे.

## टाकाऊ कृषिजन्य अवशेषांपासून कांडी कोळसा बनविणाऱ्या प्रकल्पांना आर्थिक सहाय्याची योजना -

कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी व शेतकऱ्यांकडून शेतीचे अवशेष जाळण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी कृषिजन्य अवशेषांपासून पेलेट/ब्रिकेटिंग बनविणाऱ्या संयंत्राच्या आधारे कांडी- कोळसा बनविण्याची योजना शासनाने दि. ११.०७.२००७ रोजी जाहीर केली आहे. यानंतर शासनाने दि. २६.०३.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदरची योजना सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून पुढे अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली आहे. अशा स्वरुपाच्या प्रकल्पांना प्रकल्पाच्या संयंत्राच्या किंमतीच्या २० टक्के, परंतू कमाल रु. ४.०० लाख प्रति संयंत्र यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम अर्थसहाय्य म्हणून दिली जाते. सदर योजनेअंतर्गत अखेर २१३ प्रकल्पांना अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे.

## सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प -

राज्यामध्ये सौर ऊर्जा निर्मितीस चालना देण्याकरिता शासनाने नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून पारेषण संलग्न वीज निमितीस प्रोत्साहन देण्यासाठी अपारंपारीक ऊर्जा निर्मितीचे एकत्रित धोरण-२०१५ दिनांक २० जुलै, २०१५ रोजी जाहीर केले आहे. सदर धोरणांतर्गत राज्यात ७५०० मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प सन २०२० पर्यत कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी कार्यपध्दती जाहीर केली आहे. सदर धोरणांतर्गत राज्यामध्ये एकूण १८३३ मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प ३१ मार्च, २०२१ पर्यत कार्यान्वित झाले आहे. तसेच शासनाने नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून पारेषण संलग्न वीज निर्मितीस प्रोत्साहन देण्यासाठी अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे एकत्रित धोरण-२०२० दि. ३१/१२/२०२० रोजी जाहीर केले आहे. सदर धोरणांतर्गत सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता १०००० मे.वॅ. क्षमतेचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्यापैकी ३४९१.४०४ मे.वॅ. क्षमतेचे पारेषण सलंगन सौर ऊर्जा प्रकल्प दि. ३० जून २०२५ पर्यंत कार्यान्वित झाले आहे.

## प्रधानमंत्री कुसुम योजना घटक-ब अंतर्गत सौर कृषिपंप आस्थापित करण्याची योजना -

- नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, नवी दिल्ली (MNRE) यांच्यामार्फत दि.२२ जुलै, २०१९ रोजी पीएम-कुसुम योजना निर्गमित केली व दि.१७ जानेवारी, २०२४ रोजी मार्गदर्शक सूचना अधिग्रहीत केल्या. नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली (MNRE) यांनी दि. १३ जानेवारी, २०२१ रोजी १,००,००० सौर कृषिपंप, दि. २३ जानेवारी, २०२३ रोजी २५,००० सौर कृषिपंप, दि. १४ डिसेंबर, २०२३ रोजी ८,००० सौर कृषिपंप, दि. २० ऑगस्ट, २०२४ रोजी ५०,०००, दि. २६ मे, २०२५ रोजी १५,००० सौर कृषिपंप व दि. २८ मे २०२५ रोजी १,००,००० सौर कृषिपंप असे एकूण २,८०,००० सौर कृषिपंप आस्थापित करण्यासाठी मान्यता दिली आहे
- राज्य शासनाने दि. १२ मे, २०२१ रोजी पीएम-कुसुम योजनेसाठी शासन निर्णय निर्गमित केला, या अंतर्गत दरवर्षी १,००,००० नग या प्रमाणे पुढील ५ वर्षामध्ये ५ लक्ष सौर कृषिपंप आस्थापित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले
- सदर मान्यतेस अनुसरून एकूण २,८०,००० सौर कृषिपंपाकरिता कार्यादेश देण्यात आले, महाउर्जामार्फत योजनेअंतर्गत दि. ३ जुलै २०२५ पर्यत एकूण १,७०,३५९ सौर कृषिपंप आस्थापित करण्यात आले असून उर्वरित सौर कृषिपंप आस्थापित करण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

## ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रम (सौर घरगुती दिवे) -

- केंद्र व राज्य शासन यांचेकडून दुर्गम गावे/वाड्या जेथे पारंपरिक ऊर्जा स्त्रोतांद्वारे वीज पोहोचणर नाही अशी दुर्गम गावे/वाड्या/पाडे येथील घरांचे नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्तोत्राद्वारे विद्युतीकरण करण्यासाठी महत्व देण्यात आले आहे.
- त्यानुसार महावितरणाने पुढील ५ वर्षामध्ये ज्या गावे/वाड्या/पाडे यांचे पारंपरिक पद्धतीने विद्युतीकरण करणे शक्य होणार नाही अशा ठिकाणी महाऊर्जा मार्फत ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत प्रतिवर्ष १०००० घरांचे सौर ऊजेवर चालणाऱ्या सौर घरगुती दिवे एवढे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे.
- वित्त वर्ष २०२०-२१ व वित्त वर्ष २०२२-२३ मध्ये ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमांतर्गत एकूण ७९७७ सौर घरगुती दिवे आस्थापणेचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
- वित्त वर्ष २०२४-२५ व वित्त वर्ष २०२५-२६ मध्ये ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमांतर्गत एकूण ३००० सौर घरगुती दिवे आस्थापनेकरिता ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## विकेंद्रित सूक्ष्म पारेषण प्रकल्प (RE- Micro Grid Project) -

- अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० अंतर्गत विकेंद्रित सूक्ष्म सौर पारेषण प्रकल्प, दरवर्षी २० गावांमध्ये ही योजना राबविण्याचे उद्दिष्ट.
- पारंपारिक ऊर्जेद्वारे विद्युतीकरण न झालेल्या गावांमध्ये/पाड्यांमध्ये सौर ऊर्जा किंवा अन्य अपारंपरिक ऊर्जेद्वारे विकेंद्रित सूक्ष्म पारेषण प्रकल्प (Miero Grid Project) १०० टक्के आर्थिक सहाय्य तत्वावर करावयाचे आहे.
- वित्त वर्ष २०२१-२२ मध्ये महाऊर्जा मार्फत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (ITDP) धारणी, जि. अमरावती अंतर्गत तीन विकेंद्रित सौर सूक्ष्म-ग्रिड पथदर्शी (चोपाण-२४ कि.वॅ., रेटयाखेडा-२९.४ कि.वॅ., माखळा -३७.८ कि.वॅ. असे एकूण ९१.२ कि.वॅ.) प्रकल्प आस्थापित करण्यात आले आहे.
- तसेच वित्त वर्ष २०२५-२६ मध्ये अमरावती जिल्ह्यातील, चिखलदरा तालुक्यामध्ये एकूण ३०२.५ कि.वॅ. क्षमतेचे ४ विकेंद्रित सौर सूक्ष्म-ग्रिड प्रकल्प माखला - ७१.५ कि.वॅ., बिच्छुखेडा - ४४ कि.वॅ., बोरट्याखेडा - ७७ कि.वॅ., रायपूर - ११० कि.वॅ. या ठिकाणी आस्थापित करण्याचे उद्धिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

## अमृत अभियान व महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे -

- अमृत अभियानांतर्गत तसेच महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानां तर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पामध्ये जेथे सौर ऊर्जा उपांग सामाविष्ट असेल अश्या सौर ऊर्जा उपांगांची अंमलबजावणी ही गुणवत्तापूर्ण पद्धतीने होण्यासाठी तसेच त्यामधून अपेक्षित फलनिष्पत्ती सध्या होण्यासाठी सादर सौर ऊर्जा उपांगांची कामे शासनाची सक्षम तांत्रिक यंत्रणा असलेल्या महाऊर्जामार्फत पूर्ण ठेव तत्वावर राबविण्याबाबत शासनाने दि. १७ डिसेंबर २०१८ रोजी शासन निर्णय जाहीर केला आहे.
- त्यानुसार एकूण १२ महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत येथे तांत्रिक दृष्टया पात्र एकूण ३४ ठिकाणी १५८०९ कि.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प यशस्वी रित्या आस्थापित करण्यात आले आहे.

## पी. एम. सूर्यघर: मुफ्त बिजली योजनेअंतर्गत राज्यातील सर्व शासकीय इमारतींच्या छतावर रुफटॉप सोलर प्रकल्प राबविणेबाबत -

- पी.एम.सूर्यघर: मुफ्त बिजली योजनेअंतर्गत राज्यातील सर्व सरकारी इमारतीच्या छतावर रुफटॉप सोलर प्रकल्प राबविण्याच्या महत्वाकांक्षी योजनेच्या अनुषंगाने शासकीय इमारतींचे सर्वेक्षण करण्यात येत असून सौर रूफ-टॉप प्रकल्प आस्थापनेची कामे जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातुन प्रगतीपथावर असून डिसेंबर, २०२५ अखेर पर्यंत राज्यातील सर्व शासकीय इमारतींचे सौर उर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे राज्यातील शासकीय इमारतींना लागणाऱ्या पारंपारिक ऊर्जेमध्ये बचत होणार असून सदर योजना शाश्वत व स्वावलंबी होण्यास मदत होणार आहे.
- राज्यातील शासकीय इमारतीचे महाऊर्जा मार्फत तांत्रिक सर्वेक्षण सुरू असून दि. ३०.०६.२०२५ रोजी पर्यंत एकूण ३१,३४७ सर्व्हेक्षण करण्यात आलेल्या इमातीपैकी एकूण तांत्रिक दृष्टया योग्य असलेल्या १०१४७ (१०३.१८२ मे.वॅ.) इमारतींचे अंदाजपत्रके व तांत्रिक मंजुरी संबंधित जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यात आले आहे. यापैकी एकूण ११५० (१६.८०५ मे.वॅ.) इमारतीसाठी सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करून एकूण ८०८ (९.६२७ मे.वॅ.) इमारतीसाठी कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. यापैकी ६८ (१.३२१ मे.वॅ.) इमारतीच्या छतावरती सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित करून कार्यान्वित करण्यात आलेले आहेत.

## हरित हायड्रोजन परिसंस्थेचा विकास -

- "महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण २०२३ -" महाऊर्जाद्वारे तयार करण्यात आले व महाराष्ट्र शासनातर्फे दि. १७ रोजी २०२३ ऑक्टोबर सदर धोरण प्रकाशित करणेत आले आहे.
- महाऊर्जाने (महाराष्ट्र शासनाच्या वतीने) दि. २९/०१/२०२४ रोजी आठ (०८)

हरित हायड्रोजन विकासकांसोबत सामंजस्य करार केले, असून सर्व प्रकल्पांची क्षमता १०१० केटीपीए इतकी आहे. महाऊर्जामार्फत हरित हायड्रोजन विकासकांना १०४१.२८९८ केटीपीए क्षमतेसाठी १४ Unique Project ID माहे एप्रिल,२०२५ पर्यंत देण्यात आलेले आहे. तसेच ५०.२८७८ केटीपीए क्षमतेसाठी दोन (२) हरित हायड्रोजन विकासकांना प्रकल्प नोंदणी देण्यात आलेली आहे.

- महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण -२०२३ अंतर्गत महाराष्ट्र राज्यात हरित हायड्रोजन उत्पादन सुविधा प्रकल्प (अँकर युनिट आणि प्रायोगिक अँकर युनिट) स्थापन करणेचे आहेत. या सर्व अँकर युनिट आणि प्रायोगिक अँकर युनिटची निवड निविदा प्रक्रियेद्वारे करण्यात येत आहे व त्याकरिता निविदा दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी प्रकाशित करणेत आली आहे. या कामासाठी महाऊर्जाद्वारे हरित हायड्रोजन विकासकांकडून प्रस्ताव प्राप्त करण्याची अंतिम मुदत ०४ जुलै, २०२५ आहे.
- "महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण २०२३" अनुषंगाने राज्यामध्ये हरित हायड्रोजनशी निगडीत संशोधन व विकास प्रकल्प राबविणेकरिता, उत्कृष्टता केंद्र स्थापन करणेकरिता, तसेच कौशल्य विकास द्वारे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणेकरिता NCL, ARAI, IIT Mumbai इत्यादी संस्थांना प्रत्यक्ष भेट देणेत आली आहे. (११/०२/२०२५ व १४/०२/२०२५).
- "महाराष्ट्र हरित हायड्रोजन धोरण २०२३" च्या अंमलबजावणीसाठी मा. अप्पर मुख्य सचिव ऊर्जा यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांसोबत दि. १६/०५/२०२५ रोजी आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने शासनाच्या विविध विभागामार्फत धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पुढील कार्यवाही करणेत येत आहे.
- महाराष्ट्र राज्यामध्ये हरित हायड्रोजन हब निर्मितीकरिता दि. २९/०५/२०२५ रोजी हरित हायड्रोजन भागधारक, शासनाचे विविध विभागातील अधिकारी, ADB, KPMG, TETRATECH इ.बरोबर कार्यशाळा आयोजित करणेत आली आहे.

## प्रात्यक्षिक प्रकल्पांची स्थापना -

महाराष्ट्र राज्यात नाविन्यपुर्ण आणि उच्च तंत्रज्ञानाच्या वापरावर आधारित अक्षय ऊर्जा प्रात्यक्षिक प्रकल्पांची स्थापना करणेत येत आहे, या प्रकल्पांसाठी महाऊर्जाने महाराष्ट्रातील विविध तांत्रिक संस्थांसोबत सामंजस्य करार केला आहे व सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

| अ.क्र. | प्रकल्पाचे शीर्षक | संस्थेचे नाव |
|---|---|---|
| १ | अपारंपरिक ऊर्जा आधारित इलेक्ट्रिक वाहन स्मार्ट चार्जिंग स्टेशन | (आय आय टी, मुंबई) |
| २ | ऑक्सी-स्टीम बायोमास गॅसिफिकेशन तंत्रज्ञानाद्वारे बायोमास / महापालिका घनकचरापासुन हरित हायड्रोजन निर्मिती आणि त्याद्वारे वीजनिर्मिती प्रकल्प. | |
| 3 | नॅनाफ्युलिडद्वारे सौरऊर्जा निर्मिती पॅनलची कार्यक्षमता वृद्धिंगत करण्या करीता संशोधन प्रकल्प. | (एल आय टी, नागपूर) |




MEDA महाऊर्जा

# महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)

(महाराष्ट्र शासनाची संस्था)

औंध रोड, स्पायसर कॉलेजसमोर, पशु संवर्धन आयुक्तालयाशेजारी, औंध, पुणे - ४११ ००७

दूरध्वनी: ०२०-३५०००४५० | Email - pub@mahaurja.com & Website - www.mahaurja.com